देशोन्नती
2 0 JAN 2023'

# बहिणाबाई चौधरींच्या प्रतिमेचे पूजन करून महोत्सवाचे उद्घाटन

देशोन्नती वृत्तसंकलन...



**जळगाव** ■ बहिणाबाई महोत्सवाचे उद्घाटन सोमवारी बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जिल्हाधिकारी अमन मित्तल यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षाचा शुभारंभ कृषी विभागातर्फे या महोत्सवात तृणधान्ये पूजन करून करण्यात आला. या महोत्सवात खान्देशातील विविध लोककला, शाहीरी पोवाडा, भारुड, वहीगायन आदी लोककलांबरोबरच शालेय व महाविद्यालयीन कलावंत पाच दिवस आपली कला सादर करणार आहेत.

उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर विकास पाटील कृषी संचालक, डॉ. पी. आर. चौधरी, विभागीय कृषी सहसंचालक मोहन वाघ, कृषी उपसंचालक अनिल भोकरे, उद्योगपती रजनीकांत कोठारी, अलीम थमस्ती, कुशल गांधी, बाळासाहेब सुर्यवंशी, क्रिशोर ढाके, सपन झुनझुनवाला, बाळासाहेब सुर्यवंशी, डॉ. पी. आर. चौधरी, राजेश चौधरी, पंकज जैन, रमेश मुणोत, अर्चना जाधव, शैला चौधरी उपस्थित होते. सुत्रसंचलन विनोद ढगे यांनी तर दीपक परदेशी यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला खेळ चारचौघींचा, रांगोळी स्पर्धा तसेच मेहंदी स्पर्धा झाली.

**सामाजिक संस्था, व्यक्ती व युवा मंडळांना पुरस्कार**

भरारी फाउंडेशनतर्फे दरवर्षाप्रमाणे, सामाजिक संस्था व्यक्ती व युवा मंडळांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये विकास पाटील कृषी संचालक पुणे, तात्यासाहेब फडतरे पुणे, श्रीराम पाटील जळगाव, सुकन्या पाटील कुलकर्णी, राजेंद्र ठोंबरे चाळीसगाव, राहुल पाटील चोपडा, अजिंक्य क्रांती फाउंडेशन, जळगाव प्लॉगर्स, पशूपापा फाउंडेशन समावेश आहे. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

## ■ पहिल्याच दिवशी जोरदार गर्दी

महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी जोरदार गर्दी दिसून आली महोत्सवाचे यंदाचे आठवे वर्ष असून महिला बचत गट आर्थिक सक्षम व्हावे, यासाठी प्रयत्न भरारी फाउंडेशन तर्फे करण्यात येत आहे. बचत गटाच्या स्टॉलवर मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली.